तापी एज्युकेशन सोसायटी संचालित

# भुसावळ कला, विज्ञान आणि पु. ओं. नाहाटा वाणिज्य महाविद्यालय, भुसावळ

(स्थापना : १९६३)

NAAC Reaccredited *(Fourth Cycle)* "A" grade with CGPA 3.17

UGC honoured - "College with Potential for Excellence"


फोन: (०२५८२) २४०६०६ फॅक्स: २४०७४६

Website : www.basponccollege.com

E-mail: poncollege@yahoo.com




# माहिती पुस्तक

## कनिष्ठ महाविद्यालय

## 2025-26

।। विद्या दानम् महत् पुण्यम् ।।

# BHUSAWAL ARTS, SCIENCE AND P.O. NAHATA COMMERCE COLLEGE, BHUSAWAL

*NAAC Re-Accredited "A" Grade (Fourth Cycle) with CGPA 3.17*

## VISION

**"Achieving the Excellence in Higher Education for Nation Building"**

## MISSION

**"Commitment to Excellence in Higher Education, to Empower Youth with Modern Views, Foresight, Global Competency along with Social Commitment for Nation Building"**

# ।। हार्दिक स्वागत ।।

प्रिय विद्यार्थ्यांनो,

भुसावळ येथील कला, विज्ञान आणि पु. ओं. नाहाटा वाणिज्य महाविद्यालयात तुमचं मनःपूर्वक स्वागत ! शैक्षणिक गुणवत्ता, नैतिक मूल्यं आणि सर्वांगीण विकासाच्या दिशेने सातत्याने वाटचाल करणाऱ्या आमच्या महाविद्यालयीन परिवारात सहभागी होण्याचा तुमचा निर्णय अभिनंदनास पात्र आहे. ज्ञानार्जनाच्या या प्रवासात तुमचा सहभाग महत्त्वपूर्ण असून, तुमच्या सक्रिय योगदानामुळे महाविद्यालय प्रगतीच्या नव्या टप्प्यांवर पोहोचेल, याची आम्हाला पूर्ण खात्री आहे.

कनिष्ठ महाविद्यालयात कला, विज्ञान आणि वाणिज्य शाखांच्या अभ्यासक्रमांबरोबरच किमान कौशल्य विकास कार्यक्रम देखील राबविले जातात. याशिवाय इलेक्ट्रॉनिक्स आणि संगणकशास्त्र हे द्विलक्षी विषय तसेच माहिती तंत्रज्ञान हा ऐच्छिक विषय विद्यार्थ्यांना भविष्यासाठी अधिक सक्षम बनवतो.

महाविद्यालय हे केवळ शिक्षणाचे केंद्र नसून ते विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाचेही महत्त्वाचे माध्यम आहे. येथे शिक्षणाबरोबरच प्रेरणा, आत्मविश्वास, सहकार्य, आणि जबाबदारीची जाणीव विद्यार्थ्यांमध्ये रुजवली जाते. आमचे सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी अत्यंत समर्पण व आपुलकीने विद्यार्थ्यांच्या उत्कर्षासाठी सतत प्रयत्नशील असतात.

ही माहिती पुस्तिका वाचून तुम्हाला महाविद्यालयाच्या विविध शैक्षणिक, सहशैक्षणिक आणि प्रशासकीय बाबींची सविस्तर माहिती मिळेल. त्यामुळे ही पुस्तिका नीट वाचून समजून घेणे उपयुक्त ठरेल.

तुमचं शैक्षणिक वर्ष यशस्वी, समाधानी व प्रेरणादायी ठरो, हीच आमची मनःपूर्वक शुभेच्छा !

प्राचार्य व प्राध्यापक

# अनुक्रमणिका


| १. | प्रस्तावना | पेज नं. |
|---|---|---|
| | १.१ संस्था<br>१.२ नॅक प्रमाणित महाविद्यालय<br>१.३ महाविद्यालयाची ध्येय व उद्दिष्टये<br>१.४ शिक्षक शिक्षकेतर व विद्यार्थी संख्या<br>१.५ सत्र (**Term**) मंजुरीसाठी महत्वाच्या अटी<br>१.६ विद्यार्थ्यांच्या वर्तनासंबंधी नियम | ६ ते ९ |
| **२.** | **प्रस्तावना** | **१० ते १३** |
| | २.१ महाविद्यालय इमारत<br>२.२ प्रयोगशाळा<br>२.३ ग्रंथालय<br>२.४ जिमखाना<br>२.५ हेल्थ क्लब<br>२.६ संगणक केंद्र<br>२.७ एन.सी.सी.<br>२.८ शारिरीक शिक्षण<br>२.९ एन.एस.एस.<br>२.१० वैद्यकीय मदत केंद्र<br>२.११ विद्यार्थी सहकारी ग्राहक भांडार<br>२.१२ विद्यार्थी सहाय्य निधी<br>२.१३ सायकल स्टँड<br>२.१४ कँटीन<br>२.१५ महाविद्यालयाचे वार्षिक नियतकालीक<br>२.१६ पालक शिक्षक संघ<br>२.१७ एम.एच.टी.-सी.ई.टी./NEET<br>२.१८ सालसेप<br>२.१९ शिष्यवृत्ती व आर्थिक सवलती | |

| | | |
|---|---|---|
| **३.** | **अभ्यासक्रम प्रवेश पात्रता व प्रक्रिया** | **१४ ते १९** |
| | ३.१ पात्रता<br>३.२ प्रवेश प्रक्रियेसंबंधी महत्वाच्या सुचना<br>३.३ प्रवेश प्रक्रिया<br>३.४ विषय निवडण्यासंबंधी मार्गदर्शक सुचना<br>३.५ विविध अभ्यासक्रमांच्या फी<br>३.६ फी परत मिळणेबाबत नियम<br>३.७ अनामत रक्कम (डिपॉझीट) परत मिळणेबाबत माहीती<br>३.८ ओळखपत्र<br>३.९ उच्च माध्यमीक व्यवसाय अभ्यासक्रम<br>३.१० अभ्यासक्रमाचे वैशिष्टये<br>३.११ उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम<br>३.१२ फी | |
| **४.** | **ग्रंथालय** | **२० ते २१** |
| | ४.१ माहिती<br>४.२ नियम | |
| **५.** | **परीक्षा** | **२१ ते २२** |
| **६.** | **पारितोषिके** | **२५** |
| **७.** | **महाविद्यालयाचे अनमोल संसाधन** | **२६** |
| | शिक्षक<br>शिक्षक (+२ अभ्यासक्रम)<br>शिक्षकेतर कर्मचारी | |
| **८.** | **विविध अर्ज नमुने, प्रवेश अर्ज व हमीपत्र** | **२७ ते २९** |
| | ८.१ परीक्षेपुर्वी/महाविद्यालय सोडण्यापुर्वी विद्यार्थ्याकडे येणे नसल्याचे प्रमाणपत्र<br>८.२ ग्रंथालय सभासदत्व/ओळखपत्र मिळविण्याकरिता अर्ज<br>८.३ सायकल स्टँड अर्ज<br>८.४ उपस्थितीबाबतचे हमीपत्र<br>८.५ महाविद्यालय प्रवेश अर्ज | |

## संस्था व महाविद्यालयाविषयी माहिती

**१. प्रस्तावना**

**१.१ संस्था -**

तापी एज्युकेशन सोसायटी, भुसावळ या संस्थेने शहर व परिसरातील विद्यार्थ्यांना आधुनिक आणि बहुपर्यायी शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी, शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व घडावे आणि ज्ञानाचा प्रसार सर्वसामान्यांपर्यंत व्हावा, या उदात्त हेतूने तापी एज्युकेशन सोसायटीची स्थापना सन १९५८ मध्ये करण्यात आली. सन १९६३ पासून भुसावळ कला, विज्ञान आणि पु. ओं. नाहाटा वाणिज्य महाविद्यालय कार्यरत झाले. काळाच्या गरजेनुसार संस्था सातत्याने नवनवीन अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी प्रयत्नशील आहे. सध्या संस्थेमार्फत खालील शैक्षणिक संस्था आणि अभ्यासक्रम यशस्वीरित्या चालवले जात आहेत

*** भुसावळ कला, विज्ञान आणि पु. ओं. नाहाटा वाणिज्य वरिष्ठ महाविद्यालय**

*** भुसावळ कला, विज्ञान आणि पु. ओं. नाहाटा वाणिज्य कनिष्ठ महाविद्यालय**

*** उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम**

*** तापी पब्लिक स्कूल, भुसावळ**

**१.२ नॅक प्रमाणित महाविद्यालय**

भुसावळ कला, विज्ञान आणि पु. ओं. नाहाटा वाणिज्य महाविद्यालयाला युजीसी मान्यताप्राप्त NAAC (National Assessment and Accreditation Council), बंगलोर या संस्थेकडून २००९, २०१४, २०१९ आणि अलीकडेच २०२३ साली सलग चार वेळा “A” दर्जा मिळाला आहे.उत्तर महाराष्ट्रातील तीन जिल्ह्यांपैकी सलग चार वेळा 'A' दर्जा प्राप्त करणारे हे एकमेव महाविद्यालय आहे, ही आमच्यासाठी गौरवाची बाब आहे.

**तापी एज्युकेशन सोसायटी संचालित भुसावळ कला, विज्ञान आणि पु.ओं. नाहाटा कनिष्ठ महाविद्यालयात शिकविले जाणारे विषय -**

**कला शाखा :** इंग्रजी, मराठी, हिंदी, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र,इतिहास, मानसशास्त्र, भूगोल, पर्यावरणशास्त्र, शारीरिक शिक्षण

**विज्ञान शाखा :** इंग्रजी, मराठी, हिंदी, माहिती तंत्रज्ञान, पदार्थ विज्ञान, रसायन शास्त्र, जीवशास्त्र, गणित, मानसशास्त्र, व्होकेशनल - संगणकशास्त्र, इलेक्ट्रॉनिक्स, पर्यावरणशास्त्र, शारीरिक शिक्षण

**वाणिज्य शाखा :** इंग्रजी, मराठी, हिंदी, जमाखर्च व लेखाकर्म, वाणिज्य संघटन, गणित, चिटणीसाची कार्यपद्धती, अर्थशास्त्र, पर्यावरणशास्त्र, शारीरिक शिक्षण

**⁕ उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम & रिपेअर्स**

१. इलेक्ट्रॉनिक्स टेक्नॉलोजी

२. अकौंटन्सी & ऑडीटिंग

३. मेंटनन्स & रिपेअर्स ऑफ होम अप्लायन्सेस

## १.३- महाविद्यालयाची ध्येय व उद्दिष्ट्ये :- Aims & Objectives of College

With the objective or promoting spreading and advancing wishes education in the region, The Tapti Education Society was registered in 1958 and the college was established in 1963 with the motto **" Vidya Danam Mahat Punyam " .**

To achieve this goal to college is working with the following objectives.

1. To impart, promote and spread quality based higher education.
2. To develop sense of responsibility and social commitment among the youth.
3. The broaden the vision of the youth so they have panoramic view of the society.
4. To create human resources with modern view and foresight for the development of nation.
5. To promote the research activities.

## १.४ शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी संख्या :-

महाविद्यालयातील प्राध्यापक आपापल्या विषयांत तज्ज्ञ, अनुभवी आणि कार्यक्षम आहेत. त्यामुळे महाविद्यालयीन शिक्षणाचा दर्जा सूरूवातीपासुन चांगला आहे. कनिष्ठ महाविद्यालयात ४९ प्राध्यापक असून एकुण ५३ शिक्षकेतर कर्मचारी आहेत. कनिष्ठ विभागात १५८३ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. तसेच उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम विभागात ३ शिक्षक व १ शिक्षकेतर कर्मचारी असून १२८ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत व व्दिलक्षी व्यवसाय अभ्यासक्रमांत ३३३ विद्यार्थी संख्या आहे.

## १.५ सत्र मंजुरीसाठी (Grant of Term) महत्वाच्या अटी :-

केवळ महाविद्यालयात प्रवेश घेतला व फी भरली म्हणजे सत्र मंजुर होत नाही. सत्र मंजुर होण्यासाठी खालील गोष्टींचा विचार केला जातो.

१. विद्यार्थी महाविद्यालयात सर्व दिवस तासांना हजर राहतो. शैक्षणिक वर्षात किमान ८०% उपस्थिती आवश्यक आहे.
२. प्रत्येक विषयासाठी नेमलेल्या स्वाध्याय (Tutorial) प्रश्नांची उत्तरे समाधानकारक व अभ्यासपुर्वक लिहून काढतो.
३. त्याची विहीत फी वेळेवर भरतो.
४. सर्व चाचणी परीक्षांना बसून समाधानकारक प्रगती दाखवितो.
५. महाविद्यालयात वर्गात व वर्गाच्या व्यतिरिक्त होणा-या कार्यक्रमात सहभाग दाखवितो.
६. त्याचे वर्गातील व इतर कार्यक्रमाच्या वेळेचे वर्तन सभ्य व शिस्तबध्द असते.
७. शारिरीक शिक्षणाचे तास व एन.सी.सी. परेड यांना नियमाने हजर राहतो आणि इतर खेळात भाग घेतो.
८. वाचनालयातील पुस्तके वेळेवर परत करतो.वरील नियमाविरूध्द विद्यार्थ्यांचे वर्तन झाल्यास त्याला योग्य शिक्षा होईलच शिवाय सत्र (Term)मंजुर केले जाणार नाही व त्यास परिक्षेस बसू दिले जाणार नाही.

## १.६ सत्र मंजुरीसाठी (Grant of Term) महत्वाच्या अटी :-

- महाविद्यालयाच्या सुचना फलकावर वेळोवेळी लागणा-या सर्व सूचना विद्यार्थ्याने वेळोवेळी वाचल्या पाहीजेत त्यासाठी रोज सूचनाफलक पाहण्याची सवय ठेवावी. संबधित सूचना (Notice)पाहिली नव्हती अशी सबब चालणार नाही.
- महाविद्यालयाने विद्यार्थी/ विद्यार्थिनींसाठी "ड्रेस कोड" लागू केलेला आहे. प्रत्येक विद्यार्थी/विद्यार्थिनींसाठी "ड्रेस कोड" प्रमाणे गणवेश महाविद्यालयात उपस्थित राहतांना बुधवार सोडूनइतर दिवशी वापरणे बंधनकारक आहे.
- महाविद्यालयात प्रवेश मिळाल्यावर प्रत्येक विद्यार्थ्याने ओळखपत्र **(Identity Card)** काढलेचपाहीजे व ते नेहमी जवळ बाळगलेच पाहीजे.
- प्रत्येक विद्यार्थ्याने सर्व विषयांच्या तासांना नियमितपणे वक्तशीरपणे उपस्थित राहीले पाहीजे.
- विद्यार्थ्याने आपल्या स्वतःच्या तासांखेरीज अन्य वर्गांच्या अथवा अन्य विषयांच्या तासांना संबंधीतप्राध्यापकांच्या व आवश्यक तेथे प्राचार्यांच्या परवानगीखेरीज बसू नये.

- चालू असलेल्या वर्गात वागण्याने कुठल्याही तऱ्हेचा उपद्रव होणार नाही अशी खबरदारी विद्यार्थ्याने घेतली पाहीजे.
- विद्यार्थ्याने प्रत्येक विषयाचे स्वाध्याय (Tutorial) वेळेच्यावेळी लिहून पुर्ण केले पाहीजेत त्याचप्रमाणे आपापल्या प्रात्यक्षिक प्रयोगांना हजर राहून जर्नल्स वेळेच्या वेळी पुर्ण केली पाहीजेत.
- महाविद्यालयातर्फे घेतल्या जाणा्या सर्व परिक्षांना बसून विद्यार्थ्याने प्रत्येक विषयात समाधानकारक प्रगती दाखविली पाहीजे.
- विद्यार्थ्याचा पोशाख शिष्टमान्य व निटनेटका असावा.
- महाविद्यालयात असलेल्या विद्यार्थी संघटनेच्या प्रमुखाने आपल्या संघटनेच्या पदाधिकाऱ्यांची नांवे वर्ग व रोल नंबरसहित कार्यालयात देणे आवश्यक आहे. त्यात झालेले बदलही त्वरीत कळवावे. विद्यार्थी संघटनांनी महाविद्यालयात परस्पर कोणतीही कार्यवाही करू नये. सर्व बाबतीत प्राचार्य / उपप्राचार्य यांची परवानगी घेणे आवश्यक आहे.
- महाविद्यालयात व महाविद्यालयाच्या बाहेर कोठेही विद्यार्थ्याचे वर्तन सभ्यतेचे असावे.
- सायकलीवरून येणाऱ्या विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या अधिकृत सायकल स्टँडवरच सायकलीठेवाव्यात. त्यासाठी लागणारा अर्ज विद्यार्थ्यांनी भरून कार्यालयात द्यावा.
- महाविद्यालयासाठी एस.टी. विभागाने पासची व्यवस्था केली आहे. बसमधून प्रवास करतांना एस.टी.विभागाचे नियम बंधनकारक राहतील. तसेच विद्यार्थ्याने बसमध्ये आपले वर्तन सभ्यतेने व शिष्टसंमतच ठेवले पाहीजे.
- महाराष्ट्र शासनाच्या नियमानुसार प्राध्यापकांना खाजगी शिकवण्या करता येत नाहीत आणि त्यामुळे प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना अशा खाजगी शिकवण्यांना जाता येणार नाही. मात्र आवश्यकतेनुसार मार्गदर्शपर वर्गाची सोय उपलब्ध करण्यात येईल.
- विद्यार्थी माहीतीपत्रक अतिशय महत्वाचे आहे.विद्यार्थ्यांनी त्यामध्ये सर्व नोंदी करून घ्याव्यात हेमाहीती पत्रक हरविल्यास त्यास रू. ५०/- भरून नवीन माहीतीपत्रक घ्यावे लागेल.
- नियमात वेळोवेळी केलेल्या दुरूस्त्याही विद्यार्थ्यांवर बंधनकारक राहतील. ह्या माहीती पुस्तिकेत सर्वसाधारण माहिती दिलेली आहे. एखाद्या परिपत्रकांत आलेली संपुर्ण माहीती सर्व अटींसह देता येणे शक्य नसते. त्यामुळे संबंधीत परिपत्रकानुसार संपुर्ण माहिती मिळविणे आवश्यक आहे. तशासुचना वेळोवेळी सूचना फलकावर लावण्यात येतात.
- .रॅगींग हा दखलपात्र गुन्हा आहे.प्रत्यक्ष / अप्रत्यक्ष रॅगींग होईल अशा वर्तणुकीची गंभीरपणे दखल घेतली जाईल आणि संबंधीत विद्यार्थ्यावर कठोर स्वरूपाची कार्यवाही केली जाईल.

- एखाद्या विद्यार्थ्याच्या वर्तनासंबंधी तक्रार आल्यास या संदर्भात शिस्त समितीने आणि प्राचार्यांनी घेतलेला निर्णय अंतीम आणि सर्वांवर बंधनकारक असेल.
- **महाविद्यालय परिसरात तसेच तासिकांना, परिक्षेत मोबाईल आणू नये. तसेच बोलतांना आढळून आल्यास मोबाईल जप्त केला जाईल व दंड आकारला जाईल. मोबाईल गहाळ झाल्यास महाविद्यालय जबाबदार राहणार नाही.**

## 2. महाविद्यालय व विद्यार्थी विकासासाठी सुविधा

**२.१ महाविद्यालय इमारत :-** संस्था आणि यु.जी.सी.च्या आर्थिक सहकार्याने परिसरात विविध अभ्याक्रमांसाठी वर्गखोल्या, कार्यालये व इतर आवश्यक सोयीसाठी इमारती बांधलेल्या आहेत.परिसरातील इमारतीचे इमारत A, B, C, D, E & F असे वर्गीकरण करण्यात आलेले आहे. यु.जी.सी.च्या सहकार्याने भव्य जिमखाना इमारत पुर्ण झालेली आहे. लेडीज होस्टेलची (विद्यार्थिनी वसतीगृह) इमारत प्रस्थापित आहे. अद्ययावत लेडीजरूम, स्टॉफ रूम, प्रेसिडेंट, प्राचार्य, उपप्राचार्य यांचेकरीता स्वतंत्र कार्यालय व्यवस्था उपलब्ध आहे.

**२.२ प्रयोगशाळा :-** महाविद्यालयात रसायनशास्त्र, पदार्थविज्ञान, इलेक्ट्रॉनिक्स, वनस्पतीशास्त्र, प्राणिशास्त्र, संख्याशास्त्र, भूगोल, वाणिज्य व संगणकशास्त्र, मायक्रोबायोलॉजी आणि माहितीदिले जाते. तंत्रज्ञानसाठी अद्ययावत व सुसज्ज प्रयोगशाळा असून प्रयोग करतांना विद्यार्थ्यांकडे वैयक्तिक लक्ष दिले जाते.

**२.३ ग्रंथालय :-** महाविद्यालयातील ग्रंथालयात सर्व विषयांतील महत्वाचे उत्कृष्ट ग्रंथ आहेत. विद्यापीठाच्या अभ्यासमंडळाने शिफारस केलेले ग्रंथ, क्रमिक पाठ्यपुस्तके, आणि संदर्भग्रंथ यांचासमावेश ग्रंथालयात करण्यात आला आहे.त्यानंतर अवांतर वाचनाची भरपुर मासिके,साप्ताहिक आणि दैनिके, एम.एच.टी.सी.ई.टी. ची पुस्तके घेण्यात येतात. हे ग्रंथालय सकाळपासुन संध्याकाळपर्यंत खुले असते. अनामत रक्कम भरून विद्यार्थ्यांना या वाचनालयातुन पुस्तके घरीदेण्यात येतात. याशिवाय ग्रंथालयातील पुस्तक पेढीतुन स्वतंत्र असे पुस्तके घरी अभ्यासासाठी देण्यात येतात. ग्रंथालयात भव्य वाचनकक्षही चालविला जातो. वाचनकक्षात व्यवसाय मार्गदर्शन व विविध स्पर्धा परिक्षांची पुस्तकेही वाचण्यासाठी उपलब्ध केलेली आहेत.

**२.४ जिमखाना :-** महाविद्यालयातील जिमखाना विभागतर्फे देशी विदेशी खेळांची सोय करण्यातआली असून, कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थी-विद्यार्थिनी प्रथमपासुनच खेळात आघाडीवरआहेत.विद्यार्थ्यांना आंतर विद्यालयीन, विभागीय व राज्य पातळीवरील सामान्यतः विविध खेळातप्राविण्य मिळविलेले आहे. खेळाच्या दैनंदिन सरावासाठी प्रशस्त क्रिडांगण सर्व सोयीयुक्त अद्ययावत जिमखान्याची इमारत आहे.

**२.५ हेल्थ क्लब :-** शैक्षणिक वर्ष २००१-२००२ पासून महाविद्यालयात अद्ययावत हेल्थ क्लबचीसुविधा उपलब्ध आहे. केंद्र सरकारच्या मानव संसाधन मंत्रालयाकडील अनुदानातुन हेल्थ क्लबची अद्ययावत साधने उपलब्ध करण्यात आलेली आहेत. हेल्थ क्लबची सुविधा विद्यार्थी, कर्मचारी व भुसावळ परिसरातील नागरिकांसाठी नाममात्र शुल्क घेवून उपलब्ध करून देण्यात आली आहे.

**२.६ संगणक केंद्र :-** कनिष्ठ महाविद्यालयात इ.११वी व इ.१२वी विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांना संगणकशास्त्र हया विषयाच्या अध्यापनाची योग्य ती सोय आहे. या अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्यांना एस.एस.सी. परीक्षेच्या गुणांवरून (गुणवत्तेनुसार) प्रवेश दिला जातो.

**२.७ एन.सी.सी. :-** जुन १९६३ पासुन महाविद्यालयात एन.सी.सी. विद्यार्थ्यांचे युनिट सुरू झाले आहे.एन.सी.सी. मध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शारिरीक शिक्षणामध्ये माफी मिळते. एन.सी.सी.च्या परेडस् दर रविवारी घेण्यात येतात. सन १९७५ पासुन विद्यार्थिनींचे युनिट सुरू झालेले आहे .प्रवेशासाठी विभागात माहीती मिळेल.

**२.८ शारिरिक शिक्षण :-** एन.सी.सी. न घेणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यास शारिरीक शिक्षण आवश्यक आहे. शारिरिक शिक्षणासाठी नांव नोंदविणाऱ्या विद्यार्थ्यांना यासंबंधी सविस्तर माहीती शारिरिक शिक्षणप्रमुखांकडे मिळेल.

**२.९ एन.एस.एस. :-** जुन २००५ पासून महाविद्यालयात एन.एस.एस. योजना सुरू करण्यात आली आहे. राष्ट्रीय सेवा वृत्ती हे या याजनेचे ध्येय आहे. प्रत्येक वर्षात एकूण १०० विद्यार्थ्यांना प्रवेशदेण्यात येतो प्रवेशासाठी संबंधीत विभागाकडे विहित नमुन्यांत अर्ज करावा.

**२.१० वैद्यकीय मदत केंद्र :-** महाविद्यालयातील विद्यार्थी, विद्यार्थिनी, प्राध्यापक, व शिक्षकेतर कर्मचारी यांना अचानक उद्भवलेल्या प्रकृती दोषांवर तात्पुरता (प्रथमोपचार) करण्यासाठी प्रथमोपचार केंद्र (नामांकीत) तज्ञ डॉक्टरांच्या मदतीने कार्य करीत आहे.

**२.११ सहकारी भांडार :-** १९८९-९० या शै.वर्षापासुन महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी सहकारी ग्राहक भांडार सुरू करण्यात आले आहे. सर्व विद्यार्थ्यांना यामध्ये सहभागी करून घेण्यासाठी नवीन विद्यार्थ्यांस प्रवेश शुल्क रू.१० आणि शेअर रू.१० असे एकूण २० रूपये द्यावे लागतात. आवश्यकतेनुसार सहकार भांडाराच्या दैनंदीन व्यवहारात विद्यार्थ्यांचा समावेश केला जाईल.सहकारी भांडाराच्या कार्यकारिणीत विद्यार्थी प्रतिनिधीचा आवश्यक त्या प्रमाणात सहभाग असतो.भांडारातुन वह्या, प्रात्यक्षिक वह्या, रजिष्टर्स, माहिती पुस्तिका, परिक्षा फॉर्मस्, विद्यापीठ पात्रताफॉर्मस्, इ.बी.सी., ओ.बी.सी., फी माफीचे फॉर्मस्, लिव्हींग सर्टीफिकेट मिळण्याचा फॉर्म, व स्टेशनरी इ. साहित्य योग्य किंमतीत उपलब्ध करून दिले जाते. विद्यार्थ्यांच्या सोईसाठी माफकदरात झेरॉक्सची सोय आहे.

**२.१२ विद्यार्थी सहाय्य निधी :-** या योजनेत गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना कमवा आणि शिका तसेचइतर प्रकारे आर्थिक सहाय्य करण्याचा प्रयत्न केला जातो.

**२.१३ सायकल स्टँड :-** विद्यार्थ्याने आपली सायकल / मोटर सायकल महाविद्यालयाच्या स्टँडवरच ठेवणे आवश्यक आहे. सायकल/मोटर सायकलला चांगले कूलूप लावूनच स्टँडवर ठेवावी. वाहन/सायकल महाविद्यालयाच्या बाहेर परिसराचे बाहेर रस्त्यावर ठेवू नये. वाहन/सायकलस्वतःचे जबाबदारीवर ठेवावे.

**२.१४ कॅन्टीन :-** महाविद्यालयाच्या परिसरात निसर्गाच्या सानिध्यात कॅन्टीनची सोय आहे माफक दराने चहा / कॉफी/ थंड पेय व अल्पोपहाराची सोय आहे.

**२.१५ महाविद्यालयाचे वार्षिक नियतकालिक :-** महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या साहित्य व कलाक्षेत्रातील सुप्त गुणांना वाव देण्यासाठी पोषक असे माध्यम उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जातो. या नियतकालिकाच्या माध्यमातुन महाविद्यालयात शैक्षणिक आणि इतर अभ्यासपुरक अभ्यासेत्तर उपक्रमाचे प्रतिबिंब सादर केले जाते.

**२.१६ पालक शिक्षक संघ (Parents-Teachers Association) :-** विद्यार्थ्याच्या गुणवत्ता वाढीच्या अभ्यासक्रमांबाबतच्या तसेच अभ्याक्रमेतर उपक्रमाबाबतच्या पालकांकडून विधायक सुचना मिळविण्यासाठी व अडचणी सोडविण्यासाठी त्याचप्रमाणे शिक्षण प्रक्रियेचा केंद्रबिंदू विद्यार्थी, त्याचे पालक व शिक्षक यांच्यात समन्वय साधण्यासाठी व त्या अनुषंगाने कार्यवाही करण्यासाठी शिक्षक पालक संघामार्फत पुढील काळात विविध विधायक शैक्षणिक कार्यक्रम घेण्याचा मानस आहे. सभासद वर्गणी रु.५०/- राहील. वर्गणीचे पैसे ओळखपत्र काढतांना ग्रंथालयात जमा करावयाचे आहे. यासाठी होणाऱ्या सभांसाठी पालकांची उपस्थिती अनिवार्य राहील.

**२.१७ NEET :-** संचालक वैद्यकीय शिक्षण व औषधी संचलनालय, महाराष्ट्र राज्य यांच्या मार्फत वैद्यकीय शिक्षण, इंजिनिअरिंग व फार्मसी प्रवेशासंदर्भात कॉमन एन्ट्रन्स टेस्ट (प्रवेश पात्रता परीक्षा) सुरू करण्यात आलेली आहे. या परीक्षेसाठी विज्ञान शाखेत बारावी प्रवेश घेतलेल्या किंवा उत्तीर्णअसलेल्या पण ५०% पेक्षा जास्त गुण असणाऱ्या विद्यार्थ्यांना बसता येते. या परिक्षेत गुणवत्तायादीनुसार **M.B.B.S.,B.D.S.,B.A.M.S.,B.V.M.S.,B.Y.T.H.,B.A.S.L.P.&O., B.V.Sc**. या वैद्यकीय कोर्सेस तसेच इंजिनिअरिंग व फार्मसीच्या कोर्सेसला प्रवेश देण्यात येतो.

**२.१८ शालेय किशोरावस्था जीवन कौशल्य शिक्षण कार्यक्रम- सालसेप :- (School Adolescence LifeSkills Education Programme) -** या शैक्षणिक उपक्रमातंर्गत किशोरवयीन विद्यार्थ्यांना जीवन कौशल्यविकसित करणेबाबत वर्षभर मार्गदर्शन केले जाते. तसेच एच.आय.व्ही. आणि एड्स या रोगाबाबतशास्त्रीय माहीती देण्यात येते. हा उपक्रम राबविण्यासाठी रेड रिबन क्लब स्थापन करण्यात आलाआहे व त्यामार्फत कनिष्ठ महाविद्यालय स्तरावर School Level Activities आणि सामाजिक स्तरावरया कार्यक्रमाचे आयोजन होत असते. याकामी एड्स प्रश्न पेटी

महाविद्यालयात उपप्राचार्यांच्याकार्यालयाजवळ लावलेली आहे.विद्यार्थ्यांनी सदर उपक्रमात उस्फुर्तपणे सहभाग घ्यावा.

**२.१९ विविध शिष्यवृत्ती व आर्थिक सवलती :-**

**शिष्यवृत्ती व आर्थिक सवलती मिळविण्यासाठी भरावयाच्या अर्जाकरिता मार्गदर्शक सुचना :-**

**१.** खालील विविध शिष्यवृत्ती आर्थिक सवलती मिळविण्यसाठी वेळोवेळी सुचना फलकावर लावलेल्या सुचनांप्रमाणे तसेच खालील माहितीप्रमाणे,कार्यालयात कागदपत्र देणे बंधनकारक आहे.शिष्यवृत्तीचे अर्ज व कागदपत्र प्रवेश घेतल्यापासुन १५ दिवसाच्या आत दिले पाहीजे. त्याशिवाय शिष्यवृत्ती अथवा आर्थिक सवलतीसाठी प्रवेश ग्राह्य धरला जाणार नाही. तसेच कागदपत्र वेळेत न दिल्यामुळे एखादी सवलत विद्यार्थ्यास न मिळाल्यास त्याची जबाबदारी विद्यार्थ्यावर राहील. या बाबतीत काही रास्त अडचण असतील तर कार्यालयात श्री.मिलींद फेगडे किंवा श्री.गोकुळ फालक यांच्याशी संपर्क साधावा.

२. शिष्यवृत्ती अर्ज करतांना राष्ट्रीयकृत बँकेत खाते उघडणे सक्तीचे आहे. त्याशिवाय शिष्यवृत्ती मिळणार नाही.

**३. महत्वाची टिप :-** समाज कल्याण कार्यालय, जळगांव यांचेकडून मिळणारी भारत सरकारशिष्यवृत्ती व फ्रीशिप सवलतीचे अर्ज सर्व सबंधित विद्यार्थ्यांनी ऑनलाईन भरावेत. जे विद्यार्थीऑनलाईन पध्दतीने फी सवलतीचे अर्ज भरणार नाहीत, त्या विद्यार्थ्यांनी ऑफलाईन पध्दतीनेभरावेत जे विद्यार्थी वरील अर्ज भरणार नाहीत त्यांना महाविद्यालयाची संपुर्ण फी भरावी लागेल. फीसवलतीचे अर्ज भरण्यासाठी समाज कल्याण विभागाची वेबसाईट पाहावी.

**1.www.mahaeschol.maharashtra.gov.in 2.www.mahaeschol.gov.in**

**१. इ.बी.सी. स्किम :-** आर्थिकदृष्टया मागासलेल्या वर्गातील विद्यार्थ्यांना सवलती रू.१५०००/-च्या खाली वार्षिक उत्पन्न असणाऱ्या पालकांच्या पाल्यांसाठी राज्य सरकारने ही योजना सुरू केलेलीआहे.महाविद्यालयात प्रवेश घेतांना विद्यार्थ्यांना या सवलतीसाठी कार्यालयात प्रवेश अर्जासोबतठराविक फॉर्ममध्ये अर्ज करावा लागतो. अर्जासोबत पालकांच्या उत्पन्नाचा दाखला जोडावा लागतो. दहा हजार किंवा त्यापेक्षा कमी वस्ती असणाऱ्या भागास सरकारी नियमाप्रमाणे ग्रामीण भाग असे समजण्यात येते. व दहा हजार लोकसंख्येवरील येणाऱ्या विद्यार्थ्यासाठी रू.१५०००/-च्या खाली उत्पन्न असल्याचा सरपंचाचा दाखला आणावा लागतो. दहा हजारापेक्षा अधिक लोकसंख्या असणाऱ्या शहरातुन विद्यार्थ्यांना आपल्या पालकांचे उत्पन्न रू.१५०००/ च्या खाली असल्याचा दाखला गॅझेटेड ऑफीसर्स / ऑन.मॅजिस्ट्रेट मामलेदार यांचेकडून आणावा लागतो.

**अ)** ज्या विद्यार्थ्यांस मागील वर्षी इ.बी.सी.सवलत मिळत होती त्यांना नुतनीकरण अर्ज दोन प्रतितसंपुर्ण भरून उत्पन्नाच्या दाखल्यासह द्यावेत व ज्या विद्यार्थ्यास चालू वर्षी प्रथमच इ.बी.सी. सवलत प्रतिज्ञापत्र दोन प्रतीत द्यावे.

**ब)** या योजनेखाली टंचाईग्रस्त भागात वास्तव्य असणाऱ्या इ.बी.सी. धारक विद्यार्थ्यांना प्रवेशघेतलेल्या शैक्षणिक वर्षात दि. १५ सप्टेंबर पावेतो अर्ज केल्यास परिक्षा फी शासनाकडून परत मिळते. टंचाईग्रस्त असल्याबाबतचा संबंधित अधिकाऱ्याचा दाखला सोबत जोडावा लागतो.

**२) Free Education to the Children of Primary School Teacher (F.E.P.T.) Secondary SchoolTeachers & Non-Teaching Staff (STC)** प्राथमिक / माध्यमिक शिक्षकांच्या मुलांसाठी फी ची सवलत शे.४५ पेक्षा जास्त गुण मिळणाऱ्या प्राथमिक / माध्यमिक शिक्षकांच्या पाल्यांना शासकीय अनुदानित अभ्यासक्रमांसाठी या योजनेचा फायदा मिळेल.

**३) OBC/VJNT Scholarship /Freeship Schemes-** केंद्रसरकारतर्फे मागासवर्गिय विद्यार्थ्यांना ह्यायोजनेअंतर्गत खालीलप्रमाणे शिष्यवृत्ती मिळते.

| क्र. | शिष्यवृत्ती दर - अनिवासी | शिष्यवृत्ती दर - वसतिगृह राहणारे |
|---|---|---|
| १.गट इ.११ वी १२ वी | ९०/- रु. | १५०/- रु. |

ह्या शिष्यवृत्तीसाठी उत्पन्न मर्यादा रु.१,००,०००/- मात्र उत्पन्नानुसार मंजुर करण्यात येते.ज्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रू.१,००,०००/-(रू.एक लाख मात्र) चे वर आहे. त्यांनी फ्री शिपचे अर्ज कार्यालयात मुदतीत दाखल करावेत. शिष्यवृत्तीचे कोरे अर्ज ग्राहक भांडारात मिळतात अर्जासोबत जातीचा दाखला, उत्पन्नाचा दाखला, गुणपत्रक इ. आवश्यक कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे. शिष्यवृत्ती नुतनीकरणाचा अर्ज दाखल केल्यानंतर संबंधीत विद्यार्थ्यांस शैक्षणिक साहित्य, पुस्तके व परीक्षा फी साठी अग्रीम रक्कमा दिल्या जातील.

**४) SC / ST Scholarship / Freeship Scheme**

**३. अभ्यासक्रम प्रवेश पात्रता व प्रक्रिया :-**

**३.१ पात्रता :-**

**३.२ प्रवेश प्रक्रियेसंबंधी महत्वाच्या सूचना :-**

* इ.११वी मध्ये एस.एस.सी. परिक्षेचा निकाल जाहीर झाल्यानंतर त्वरीत आठ दिवसाचे आंत गुणवत्तेनुसार प्रवेश देण्यात येईल. **ह्याच महाविद्यालयातुन इ.११वी पास झाल्यानंतर इ. १२वीतप्रवेश घेणे बंधनकारक आहे.**

* फी बाबत माहिती स्वतंत्रपणे माहिती पुस्तिकेत दिली आहे.

* विद्यार्थ्यांना प्रवेशासंबंधी तसेच अभ्यासक्रम निवड इ.साठी मार्गदर्शन अनुभवी प्राध्यापकांमार्फत प्रवेश मार्गदर्शन कक्षात मिळेल.

**३.३ प्रवेश प्रक्रिया :-**

१. प्रवेश प्रक्रियेसाठी सर्वप्रथम माहिती पुस्तिका ग्राहक भांडारातुन विकत घ्यावी.

२. माहिती पुस्तिकेतील माहीती व सुचनांचे काळजीपुर्वक वाचन करून प्रवेश अर्ज व हमीपत्रसुवाच्च अक्षरात भरावे.

**३. प्रवेश अर्जासोबत जोडावयाचा कागदपत्रके :-**

**अ) इ.११ वी वर्गाच्या प्रवेशासाठी :-**

- एस.एस.सी. परीक्षेचे मुळ गुणपत्रक व दोन झेरॉक्स प्रती
- शाळा सोडल्याचा मुळ दाखला व दोन झेरॉक्स प्रती
- जातीचा दाखला दोन झेरॉक्स प्रती, आधारकार्ड झेरॉक्स
- विद्यार्थ्याचे व पालकांचे हमीपत्र

**ब) इ.१२ वी वर्गाच्या प्रवेशासाठी :-**

- एस.एस.सी. परीक्षेचे गुणपत्रकाची एक झेरॉक्स प्रत
- इ.११वी च्या गुणपत्रकाच्या दोन झेरॉक्स प्रत, आधारकार्ड झेरॉक्स
- शाळा सोडल्याचा मुळ दाखला व दोन झेरॉक्स प्रती
- (इतर महाविद्यालयातुन ११ वी पास झालेल्या विद्यार्थ्यांसाठी जातीचा दाखला) दोनझेरॉक्स
- विद्यार्थ्याचे व पालकांचे हमीपत्र

**४.** वरील आवश्यक कागदपत्रे जोडून प्रवेश अर्ज मार्गदर्शन कक्षात तपासुन घ्यावा. कार्यालयात दक्षिणेकडील खिडकी क्र.१ मध्ये कॅशिअर यांचेकडे प्रवेश अर्ज, इतर आवश्यक कागदपत्रे व फी जमा करावी.

**५.** एकदा भरलेली फी कोणत्याही सबबीवर परत केली जाणार नाही.यासंबंधी अधिकार मा. प्राचार्य यांचे राहतील.

**६.** प्रवेश अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रांच्या (प्रमाणपत्रे, गुणपत्रके, दाखला इ.) झेरॉक्स प्रती विद्यार्थ्यांनी स्वतःजवळ आपल्या सोईसाठी ठेवाव्यात. एकदा अर्ज दाखल केल्यावर अशी कागदपत्रे झेरॉक्स करण्यासाठी किंवा इतर कामासाठी महाविद्यालयातुन दिली जाणार नाहीत.

**७.** महाराष्ट्र राज्यातील एस.एस.सी. बोर्ड व्यतिरिक्त इतर बोर्डस् मधील विद्यार्थ्यांनी प्रवेश घेण्याच्या आधी नाशिक बोर्डाच्या नाशिक येथील कार्यालयाकडून तात्पुरते पात्रता प्रमाणपत्र आणणे आवश्यक आहे. **पत्ता- मा.विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्य. व उच्च माध्य. शिक्षणमंडळ, नाशिक विभागीय मंडळ मुंबई आग्रा रोड, वणी हाऊस, नाशिक.**

८. अंतीम पात्रता प्रमाणपत्र मिळेपर्यंत सदर विद्यार्थ्याचा प्रवेश केव्हाही रद्द होवू शकतो. अशा विद्यार्थ्यांनी एस.एस.सी.पासिंग सर्टीफिकेट वेळेच्या आंत ऑफीसमध्ये जमा करणे आवश्यक आहे.

९. कला आणि वाणिज्य शाखांसाठी मराठी माध्यमाच्या आणि विज्ञान शाखेसाठी इंग्रजी माध्यमांच्या तुकड्या राहतील. ११वी, १२वी वाणिज्य शाखेसाठी इंग्रजी माध्यमाच्या स्वतंत्र तुकड्या राहतील.

## ३.४ - विषय निवडण्यासंदर्भात मार्गदर्शक सूचना :-

इ.११ वीट निवडलेले विषय इ.१२ वीत घ्यावे लागतात. एकदा विषय निवडल्यानंतर त्यात बदल करता येणार नाही.शिक्षण खात्याने त्यात बदल करण्याच्या परवानगीचा आदेश दिल्यांनंतरच तशी परवानगी मिळेल. विषय खालीलप्रमाणे घ्यावयाचे आहेत. प्रत्येक विषयाचा सांकेतिक (कोड ) नंबर पुढे दिलेला आहे. प्रवेश अर्जामध्ये त्याचा उल्लेख करावा.

| विषय प्रकार | कला शाखा | वाणिज्य शाखा | विज्ञान शाखा |
|---|---|---|---|
| अनिवार्य<br>(Compulsory) | इंग्रजी (०१)<br>English(01)<br>पर्यावरणशास्त्र(३१)<br>Enviroment Education (31)<br>शारिरिक शिक्षण(३०)<br>Physical Education (30) | इंग्रजी (०१)<br>English(01)<br>पर्यावरणशास्त्र(३१)<br>Enviroment Education (31)<br>शारिरिक शिक्षण(३०)<br>Physical Education (30) | इंग्रजी (०१)<br>English(01)<br>पर्यावरणशास्त्र(३१)<br>Enviroment Education (31)<br>शारिरिक शिक्षण(३०)<br>Physical Education (30) |
| आवश्यक विषय<br>(कोणतेही एक)<br>Neccesary Subject<br>(Any one) | मराठी(०२)/हिंदी(०४)<br>Marathi(02)/ Hindi (04) | मराठी(०२)/हिंदी(०४)<br>Marathi(02)/ Hindi (04)<br>माहिती व तंत्रज्ञान(९९)<br>Information Technology(99) | मराठी(०२)/हिंदी(०४)<br>Marathi(02)/ Hindi (04)<br>माहिती व तंत्रज्ञान(९७)<br>Information Technology(97) |
| ऐच्छिक विषय<br>(कोणतेही चार)<br>Optional Subject<br>(Any Four) | अर्थशास्त्र (४९)<br>Economics(49)<br>राज्यशास्त्र (४२)<br>Politics(42)<br>इतिहास (३८)<br>History(38)<br>हिंदी (०४)<br>Hindi(04)<br>मानसशास्त्र (४८)<br>Psychology(48)<br>भूगोल (३९)<br>Geography(39)<br>संगीत (६५)<br>Music (65) | जमाखर्च व लेखाकर्म (५०)<br>Book Keeping & Accountancy(50)<br>वाणिज्य संघटन व व्यवस्थापन (५१)<br>Organization of Commerce & Management (51)<br>चिटणिसाची कार्यपध्दती(५२)<br>Secretarial Practice(52)<br>OR<br>गणित (८८)<br>Mathematics (88)<br>अर्थशास्त्र (४९)<br>Economics(49) | पदार्थ विज्ञान (५४)<br>Physics(54)<br>रसायनशास्त्र (५५)<br>Chemistry (55)<br>जीवशास्त्र (५६)<br>Biology (56)<br>गणित(४०)/मानसशास्त्र(४८)<br>Maths(40)/Pchycology(48)<br>व्होकेशनल संगणकशास्त्र(डी-९)<br>Vocational Computer Science (D-9)<br>इलेक्ट्रॉनिक्स (सी-२)<br>Electronics (C-2) |

**टीप :-**

**अ)** कोणत्याही विषयासाठी किमान २० विद्यार्थी असल्यास ते विषय शिकविण्याचा विचार करण्यात येईल .

**ब)** इ. ११ वी, इ. १२ वी वाणिज्य या वर्गासाठी पुरेसे विद्यार्थी असल्यास इंग्रजी माध्यमातून शिकविण्याची व्यवस्था आहे.

**क)** इ. १२ वी विज्ञान वर्गास ३ सायन्सचे विषय घेतले असल्यास एफ.वाय.बी.एस्सी. ला प्रवेश मिळतो.

**ड)** नापास झालेल्या विद्यार्थ्यांना पुन्हा प्रवेश घ्यावयाचा असल्यास सर्व विषयांची परीक्षा वर्षाच्या शेवटी द्यावी लागेल.

**इ)** एकदा भरलेली फी वरात केली जाणार नाही. नेमून दिलेल्या तारखेचा आत फी न आल्यास दंड आकारण्यात येईल.

**ई)** महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यास संयुक्तिक कारण असल्याशिवाय शाळा सोडल्याचा दाखला मिळणार नाही.

**३.५ विविध अभ्यासक्रमांची फी पुढील चार्टमध्ये देण्यात आली आहे.**

## JUNIOR COLLEGE FEE CHART FOR THE YEAR 2025-26 (PAYING)

| Sr. No. | | XI Arts | XI Comm | XI Sci. | XII Arts | XII Comm | XII Sci. | XI Sci. (NG) | XII Sci.(NG) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Tution Fee | 192 | 192 | 192 | 216 | 216 | 216 | 900 | 1200 |
| 2 | Term Fee | 32 | 32 | 32 | 36 | 36 | 36 | 32 | 36 |
| 3 | ADM Fee | 16 | 16 | 16 | 18 | 18 | 18 | 16 | 18 |
| 4 | Lab Fee | -- | -- | 150 | -- | -- | 150 | 450 | 450 |
| 5 | Coll. Exam Fee | 200 | 200 | 200 | 200 | 200 | 200 | 200 | 200 |
| 6 | L.C.Fee | -- | -- | -- | 10 | 10 | 10 | -- | 10 |
| 7 | MAG Fee | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 |
| 8 | GYM Fee | 200 | 200 | 200 | 200 | 200 | 200 | 200 | 200 |
| 9 | Board exam Fee | -- | -- | -- | 420 | 420 | 480 | -- | 480 |
| 10 | Dep.for New ADM | 30 | 30 | 45 | -- | -- | -- | 45 | -- |
| 11 | Co.Op. Store Fee | 20 | 20 | 20 | -- | -- | -- | 20 | -- |
